# सूचना

Notice No.: OP/BN/IN/AUG24-01.

दिनांक : ०९ ऑगस्ट २०२४.

प्रति,
ब्रांच / ऑपरेशन्स मॅनेजर,
चंदुकाका सराफ ज्वेल्स

विषय : EXCHANGE BONUS OFFER बाबत

महोदय,

आपणा सर्वांना कळविण्यात अत्यंत आनंद होतो आहे कि, दिनांक १३ ऑगस्ट २०२४ ते ०१ सप्टेंबर २०२४ दरम्यान आपण आपल्या शाखेमध्ये Exchange Bonus या खास ऑफर चे आयोजन करीत आहोत आणि यामध्ये ग्राहकास त्यांच्या कोणत्याही जुन्या सोने दागिन्यांच्या एक्सचेंज व्हॅल्यू मध्ये प्रति ग्रॅम रुपये २५०/- पर्यंतचा अतिरिक्त लाभ (Exchange Bonus) मिळणार आहे. तपशील माहिती पुढीलप्रमाणे:

1827
Jewels
चंदुकाका सराफ ज्वेल्स

Detail:

१.सदर ऑफर हि केवळ सोने दागिन्यांकरिता वैध्य असून मर्यादित कालावधी करिता उपलब्ध राहील.

२. शुद्ध सोने, नाणं, बुलियन तसेच प्लेन दागिने जसे की पाटली, बांगडी, मणी इत्यादी खरेदीकरिता सदर ऑफर ग्राह्य राहणार नाही.

३. ग्राहक त्यांच्या जुन्या सोन्याच्या वजनानुसार त्याबदल्यात नवीन सोने दागिने खरेदी करीत असल्यास प्रति ग्रॅम रुपये १५०/- आणि हिरे दागिन्यांची खरेदी करीत असल्यास प्रति ग्रॅम रुपये २५०/- अतिरिक्त लाभ दिला जाईल.

उदाहरणार्थ:
ग्राहक त्यांचे १० ग्रॅम जुने सोने Exchange करीत असल्यास:

a. १० ग्रॅम किंवा अधिक वजनाचे नवीन सोने दागिने खरेदी करीत असल्यास १५०/- रुपये प्रति ग्रॅम अनुसार १,५००/- रुपये अतिरिक्त लाभ स्वरूपात ग्राहकास Exchange Value मध्ये देण्यात येईल.

b. १० ग्रॅम किंवा अधिक वजनाचे नवीन हिरे दागिने खरेदी करीत असल्यास २५०/- रुपये प्रति ग्रॅम या अनुसार २,५००/- रुपये अतिरिक्त लाभ ग्राहकास Exchange Value मध्ये देण्यात येईल.

४. सदर लाभ रक्कम हि ग्राहकास नवीन सोने किंवा हिरे दागिन्यांच्या खरेदीमध्ये वापरात येईल.

**५. सदर ऑफर हि केवळ रेडी स्टॉक दागिन्यांकरिता उपलब्ध राहील आणि ऑर्डर च्या कोणत्याही खरेदी करीता ग्राह्य राहणार नाही.**

# सूचना

६. ग्राहक जमा करीत असलेल्या कमीत कमी जुन्या सोने दागिन्यांच्या वजनाइतके किंवा अधिक वजनाचे नवीन सोने दागिने खरेदी करणे अनिवार्य राहील.

७. मोडीची उर्वरित रक्कम ग्राहकास कोणत्याही सबबीवर परत केली जाणार नाही.

८. सदर ऑफर हि GTS+, कल्पतरू तसेच GDP योजनेकरिता उपलब्ध राहील.

**Sales Person:**

१. Rotational Sales Person ने ग्राहक Attend करतेवेळी ग्राहकाची सोने दागिन्यांची URD असल्यास ग्राहकास Exchange Bonus Offer ची माहिती सांगावी.

२. ग्राहक जुने सोने दागिने देऊन Exchange मध्ये नवीन सोने किंवा हिरे दागिने खरेदी करीत असल्यास ग्राहकास URD Person मार्फत सदर दागिन्याची URD Exchange Note उपलब्ध करून द्यावी.

३. ग्राहकाने निवडलेल्या नवीन सोने किंवा हिरे दागिन्यांची Delivery Note Generate केल्यानंतर ऑफर नुसार ग्राहकाकडे असलेल्या URD Delivery Note वर ग्राहक Exchange Bonus Offer करिता ग्राह्य असलेले वजन नमूद करावे.

   उदाहरणार्थ :

   1. ग्राहकाने १० ग्रॅम जुने सोने दागिने मोडून २० ग्रॅम चे नवीन सोने दागिने खरेदी केल्यास सेल्स पर्सन ने URD Exchange Note वर "Applicable Weight १० Gram" असे नमूद करावे.

   2. ग्राहकाने १० ग्रॅम जुने सोने दागिने मोडून ५ ग्रॅम चे नवीन सोने दागिने आणि ५ ग्रॅम चे सोने बुलियन खरेदी केल्यास सेल्स पर्सन ने URD Exchange Note वर "Applicable Weight ५ Gram" असे नमूद करावे.

   3. ग्राहकाने २० ग्रॅम जुने सोने दागिने मोडून १० ग्रॅम चे नवीन सोने दागिने खरेदी करीत असल्यास सेल्स पर्सन ने URD Exchange Note वर "Applicable Weight १० Gram" असे नमूद करावे.

   4. ग्राहकाने १० ग्रॅम जुने सोने दागिने मोडून १५ ग्रॅम चे नवीन सोने दागिने आणि १० ग्रॅम चे सोने बुलियन खरेदी केल्यास सेल्स पर्सन ने URD Exchange Note वर "Applicable Weight १० Gram" असे नमूद करावे.

४. महत्वाची सूचना:

   ग्राहक Exchange Bonus Offer करिता ग्राह्य असल्यास संबंधित ग्राहकाच्या URD Exchange Note वर आवश्यक ते वजन नमूद करणे हि संबंधित सेल्स पर्सन ची जबाबदारी राहील याची नोंद घ्यावी.

   ग्राहकाने URD केलेला जुना दागिना हा Purchase From Us असल्यास दागिन्यांचे Net Weight नमूद करावे तसेच Purchase From Other असल्यास Fine Weight नमूद करावे.

# सूचना

Cashier:

१. कॅशियर ने संबधित ग्राहकाच्या दागिन्यांचे सेल बिल करतेवेळी ग्राहकाजवळील URD Exchange Note ची विचारणा करावी व त्यामध्ये Gold Exchange Weight नमूद आहे कि नाही याची खात्री करावी.

२. कॅशियर ने Sale Bill करतेवेळी “URD Net Weight” या फिल्ड मध्ये ग्राहकाजवळील URD Exchange Note वरील सेल्स पर्सन मार्फत नमूद केलेले वजन Insert करावे. त्याकरिताची होणारी रक्कम “URD Offer Discount” या फील्ड मध्ये दाखविण्यात येईल.

३. URD Offer Discount ची रक्कम ग्राहकाच्या सेल बिल मधून सिस्टिम मार्फत Auto वजा होईल याची नोंद घ्यावी.

सदर ऑफर हि खालील Document करीता ग्राह्य राहील.

Documents:

1) 11 Gold Sales Bill
2) 41 Diamond Jewel Sales Bill
3) GTS Order Sales Bill
4) Kalpataru Order Sale Bill
5) GDO Order Sale Bill
6) Loan Gold Sales Bill
7) Loan Diamond Jewel Sales Bill
8) Loan GTS Diamond Order Sales Bill
9) Loan KPT Diamond Order Sales Bill

1827 Jewels
चंदुकाका सराफ ज्वेल्स

सदर सूचना आपल्या संबंधित स्टाफ ना द्यावी व त्वरित कार्यरत करावी तसेच सूचनेबाबत कोणतीही शंका असल्यास त्वरित ऑपेरेशन डिपार्टमेंट शी संपर्क साधावा.

आदेशावरून,

ऑपरेशन्स डिपार्टमेंट
पुणे हेड ऑफिस

१. ब्रांच मॅनेजर

२. ऑपरेशन्स मॅनेजर

३. फ्लोर इन्चार्ज

४. इतर